**सीताराम म्हात्रे फाऊंडेशनच्या "मराठी संतसाहित्य युनिकोडमध्ये" प्रकल्पास प्रारंभ**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून प्रोजेक्ट गुटनबर्गच्या धर्तीवर मराठीतील समग्र संतसाहित्य इंटरनेटवर युनिकोडमध्ये उपलब्ध करण्याचे कार्य नवी मुंबईमधील सीताराम म्हात्रे फाऊंडेशनने हाती घेतले आहे. इ.स. 1200 ते इ.स. 1700 पर्यंतचे संतसाहित्य जगभरातील सर्व अभ्यासकांना एका क्लिकवर विनामूल्य उपलब्ध होऊन पाठ विश्लेषणासारख्या (Textual Analysis) संगणकीय मानव्यविद्याशाखेच्या अत्याधुनिक संशोधन पद्धतींचे विस्तीर्ण दालन मराठी अभ्यासकांना खुले व्हावे हा या उपक्रमामागचा हेतू आहे.

महाराष्ट्र शासन आणि इतर अनेक संस्था व व्यक्तींच्या अथक परिश्रमाने बरेचसे संतसाहित्य इंटरनेटवर उपलब्ध झालेले आहे, परंतु ते बहुतकरून छापील पुस्तकांची छायाचित्रे काढून बनविलेल्या पीडीएफ फाईलच्या स्वरूपात आहे. अशा पीडीएफ फाईलमधील मजकुरावर कोणत्याच प्रकारची संगणन प्रक्रिया (Data Processing) करणे शक्य नसते, याउलट युनिकोडमध्ये उपलब्ध असलेले तुरळक अभंग इंटरनेटवर असंख्य पानांवर विखुरलेल्या स्वरूपात आहेत. त्यामुळे संतांच्या समग्र साहित्याचे संगणकीय विश्लेषण करणे अभ्यासकांना शक्य होत नाही.

समग्र मराठी संतसाहित्याच्या भाषाशास्त्रीय अभ्यासाला (Corpus Linguistics) चालना मिळण्यासाठी ते साहित्य इंटनेटवर एका ठिकाणी युनिकोडमध्ये सहज उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. सीताराम म्हात्रे फाऊंडेशनने हाती घेतलेल्या "मराठी संतसाहित्य युनिकोडमध्ये" या प्रकल्पामुळे लवकरच ही सुविधा तमाम मराठी विद्यार्थ्यांना व अभ्यासकांना विनामूल्य उपलब्ध होणार आहे. तरी ह्या उपक्रमात स्वयंसेवक म्हणुन सहभागी होण्याचे विनम्र आवाहन फाऊंडेशनने केलेले आहे. यासाठी आपल्याकडे संगणक आणि इंटरनेट उपलब्ध असणे एवढेच अपेक्षित आहे. मराठी टायपिंग (आकृति, कृती देव, वगैरे) करता येणे आवश्यक नाही. संपूर्ण उपक्रम गूगल इनपुट टूल्स व गूगल डॉक्सच्या (Google Docs) सहाय्याने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे संगणकाचे विशेष ज्ञान असणे अपेक्षित नाही.

**ह्या प्रकल्पांतर्गत** 100 किंवा त्याहून अधिक अभंग टाइप करणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाचे नाव त्यांनी टाइप केलेल्या अभंग संख्येसह संबंधित गाथेच्या वेबपेजवर नमूद करण्यात येईल. त्याचबरोबर 1,000 किंवा त्याहून अधिक अभंग टाइप करणाऱ्या स्वयंसेवकांना फाऊंडेशन तर्फे विशेष प्रशस्तिपत्रक देण्यात येईल. या उपक्रमात सहभागी होऊन मायमराठीची सेवा करण्यासाठी कृपया **info@sitarammhatre.foundation** या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधा किंवा स्वयंसेवक म्हणून आपले नाव येथे नोंदवा : https://www.sitarammhatre.foundation/contact अधिक माहितीसाठी +91-865-735-1636 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.